महाराष्ट्राचा मानबिंदू
# लोकमत
पृष्ठे : १२+८ = २०, किंमत: ₹ ४.००
पुणे, सोमवार, दि. ४ डिसेंबर २०१७

Pg No. 1 & 12



## इथिओपियाच्या धावपटूंचे वर्चस्व

देशातील मॅरेथॉनची जननी समजली जाणारी पुणे मॅरेथॉनची ३२वी शर्यत रविवारी पार पडली. पहाटे साडेपाच वाजता सणस मैदानापासून सुरू झालेली ही शर्यत त्याच मैदानावर संपली. यात आफ्रिकन धावपटूंनी सहभाग नोंदविला. इथिओपियाच्या धावपटूंनी वर्चस्व राखले. मुख्य शर्यतीत इथिओपियाचा गेताचू बेशा विजेता ठरला. भारतीय गटामध्ये करणसिंग आणि संपदा बुचडे या पुणेकरांनी बाजी मारली. - वृत्त/१२

